University Grants Commission, New Delhi Recognized Journal No. 41311
ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

# अण्णा भाऊ साठे : मराठी साहित्यातील शेक्सपीअर

डॉ. बी. एन. गायकवाड
(इंग्रजी विभागप्रमुख), ना.ग. आचार्य आणि दा. कृ. मराठे महाविद्यालय, चेंबूर, मुंबई-

साहित्य हा जन्म मृत्यू, सुख – दु:ख आचार विचार कृती – संस्कृती अशा अनेक भावनांचा व अवस्थांचा अतिसूक्ष्म विश्लेषणात्मक अभ्यास होय. महाराष्ट्राच्या संपन्न भूमीत आजतागायत अनेक विद्वान, लेखक, साहित्यीक, विश्लेषक जाणकारांची निर्मित झालेली आहे. प्रत्येक साहित्यिकाने साहित्य जगताला यथाशक्ती योगदान दिले आहे.

थोर साहित्यीक लोकशाहिर अण्णा भाऊ साठे हे मराठी साहित्यातील असेच एक असामान्य व्यक्तिमत्व होय 09 ऑगस्ट 1920 हा त्यांचा जन्मदिवस तत्कालीन सामाजिक परस्थितीत हीन समजल्या जाणाऱ्या, अति मागासलेल्या समाजातील लोकांमध्ये शिक्षणाचा मोठा अभाव होता, व अण्णाभाऊ हे याच समाजाचा एक भाग होते. शैक्षणिक व वैचारिक वारसा न लाभलेल्या अण्णा भाऊ साठे ह्यांनी मात्र बौद्धिक दृष्ट्या उच्च प्रकारच्या साहित्याची निर्मिती केली. अण्णांच्या तळपत्या लेखणीने समाजातील सर्व दुष्ट प्रवृत्तींवर हल्ला चढविला जातिवाद, भ्रष्टाचार, असमानता, वर्णभेद, सावकारशाही, बेबंदशाही, वैगरे वर त्यांनी अतिशय प्रखर विचार मांडल्याचे शेकडो संदर्भ त्यांच्या साहित्यात पहावयास मिळतात. समाजवाद, सामाजिक न्याय, स्त्रिदाक्षीण्य व अधिकार ही विचारसरणी अण्णांच्या साहित्यात ठासुन भरली आहे.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कॉलेज, खाजगी शिकवण्या, महाविद्यालयीन शिक्षण, परदेशी शिक्षणाची ऐट या किंवा अशा इतर शैक्षणिक सुविधांपासून कोसो मैल दूर असलेल्या अण्णांनी स्वत:च एकलव्य व गुरु द्रोणाचार्य बनुन शिक्षण घेतले. त्याची ज्ञानसाधना एवढ्यावरच न विसावता त्यांनी सरस्वतीची साधना व त्याद्वारे गरीब, मागास, दुर्लक्षित व सुखवस्तू जीवनांची ज्यांना कल्पनाही नव्हती अशा कष्टकऱ्याबद्दल अत्यंत जिव्हाळ्याने लिहिले. अण्णांच्या लिखाणाचा काळ हा यांचा जीवनातील सर्वात महत्वाचा काळ आहे. अण्णांच्या कादंबऱ्या, कथा, पोवाडे, लावण्या, कविता ह्यातून समाजातील अविभाज्य भाग असणाऱ्या परंतु सापत्नीक वागणूक मिळणाऱ्या कामगारांबद्दल, त्यांची निष्ठा, त्यांची जीवन जगण्याची प्रचंड उमेद आणि त्यांच्या मनातील सुखाची अव्याहत वाहणारी मांगल्याची भावना त्यांच्या सुंदर मिलाफ आहे. अण्णाभाऊचं साहित्य अन्यायाविरुद्ध लढण्याची, मराठी बाणा जोपासण्याची व संस्कृतीवर प्रगाढ प्रेम करण्याची शिकवण देते. अण्णांच्या साहित्यात स्वप्नरंजनांचा शोध म्हणजे

वाळवंटात पाणी शोधण्यासम आहे. कारण अण्णा भाऊ साठे स्वत: म्हणत असत की, “मी कल्पना करून लिहित नाही आणि मला ते जमत नाही. मी जे अनुभवतो तेच लिहितो” यावरून अण्णांच्या साहित्यातील सत्यवादाची कास किती खोलवर रुजली आहे याची कल्पना येते.

अण्णांबद्दल आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे त्यांचे शैक्षणिक आयुष्य हे केवळ एक दिवसाचे होते. एवढी तुटपुंजी ज्ञानसंपदा व जिद्द यांचा बळावर अण्णांनी प्रगाढ विद्वत्ता मिळवली. अण्णांनी सर्व साहित्य प्रकारात विस्तिर्ण लिखाण केले आहे. त्यांच्या 14 वगनाट्य, 10 पोवाडे, 2 प्रवासवर्णन, 3 नाटकं, 37 कादंबऱ्या, 22कथासंग्रह, 12 चित्रपटकथा, 13 गीत पुस्तिका असा प्रचंड गुणात्मक साहित्यसाठा उपलब्ध आहे. अण्णांचे साहित्य हे तत्कालीन सामाजिक जिवनाचे वास्तविक चित्रच होय. त्यांच्या साहित्यात आशावाद, करुणा, नैतिकता, संस्कृतीबद्दलचा अभिमान, राष्ट्राभिमान, मातृभाषेवरील प्रेम असे व यांसारखे असंख्य मौल्यवान विचार मिळतात. कामगार वर्गावर तर अण्णांचे दृढ प्रेम होते . 1958 सालच्या दलित साहित्य समेंलनाच्या अध्यक्षीय भाषणात अण्णांनी “पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसुन ती दलित, श्रमिक व कामगारांच्या तळहातावर तरली आहे” असे उद्‌गार काढले.

कोणत्याही प्रकारच्या शिक्षणाचा गंध नसतानाही तात्वीक दृष्ट्या बलाढ्य समकालीन परंतु दुरगामी विचार जागवणारं, अन्यायाविरुद्ध लढाईसाठी बळ देणारं ऐतिहासिक, अनमोल, साहित्य अण्णाभाऊ साठे यांनी निर्माण केले. “फकिरा” अण्णाभाऊची कादंबरी म्हणजे मराठी साहित्यातील अजरामर कलाविष्कारच ! यामुळेच “फकिरा” स महाराष्ट्रशासनाचा 1961 सालचा प्रथम पुरस्कार बहाल करण्यात आला. दलित व मराठी कादंबरी साहित्यप्रकारातील अत्यंत प्रभावी कादंबरी म्हणूनही या पुस्तकाचा नावलौकिक आहे. “फकिरा” च्या प्रथम आवृत्तीस स्वत: जेष्ठ साहित्यीक वी.स. खांडेकर यांनी प्रस्तावना लिहिली ते म्हणतात,

“ अण्णा भाऊंची पात्र झुंजार आहेत आणि बहुशः तीन गोष्टींसाठी ती रण मारण्याची तयारी करून बसतात. पुरुषांचा स्वाभिमान, स्त्रिचे शिल आणि देशाचे रक्षण, भुक व तृष्णा यासाठीही ते नेहमी युद्ध प्रवृत्त होतात.”

सत्याची चाड, शिलाची जपणूक, स्वत: जगून इतरांना जगण्याची उमेद व प्रेरणा, खंगलेल्या माणसांमध्येही लढण्याचे प्रचंड बळ निर्माण करण्याची शक्ती, अशी एकत्रित ताकद अण्णांच्या “फकीरा”त आहे.

अण्णा भाऊंचे साहित्य, सामाजिक कार्यकर्त्यांना प्रेरणास्थानी वाटते तर विचारवंतांना अण्णा भाऊ विचारवंतापैकी वाटतात. तर अभ्यासकांना अण्णा भाऊ साठे चिंतनशील प्रकृतीचे लेखक वाटतात. एकदंरित अण्णा भाऊ साठे मार्क्सवादी,

जिवनवादी, आंबेडकरवादी, स्त्रीवादी व दलित ग्रामिण भटक्या विमुक्तांचे आणि आदिवाशांच्या जीवनातील कोडे, हालआपेष्टाचे मुल्य व जगण्याची उमेद यांची उत्तम मांडणी करणारे महान लेखक ठरतात.

कला, व वाड.मय क्षेत्रात अनेक असामान्य लेखक व कलावंतानी वैश्वीक स्वरुपात योगदान दिलं आहे. इंग्रजी साहित्यातील अशाप्रकारे अजरामर व्यक्तिमत्व म्हणजे विलियम शेक्सपिअर. इंग्रजी साहित्यकार विलियम शेक्सपिअरने सुखांतिका, शोकांतिका सॉनेट, कविता व नाटक या साहित्य प्रकारात जगातील सर्व शाळा व विद्यापीठांमधून शिकवण्या योग्य उच्च साहित्याची निर्मिती केला. इग्रंजी समीक्षकांनी शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' या नाटकाला विश्वातील सर्वात जास्त वाचलं गेलेले व समिक्षिलेलं नाटक अस बिरूद लावलं आहे. शेक्सपिअरच्या मकबेथ, ऑथेल्लो, किंग लिअर, व ज्युलीअस सीझर ह्या अजरामर शोकांतिका **(**Tragedy**)** विविध छटा मानवी भावविश्वाची सूक्ष्म उकल, अहंकार, प्रेम, लालसा, शंकेखोर वृत्ती, लढवय्यी वृत्ती या सारख्या अनेक पैलूवर स्वत:च्या तुटपुंज्या शिक्षणाच्या परंतु प्रबळ स्वानुभावाच्या आधारे अत्यंत प्रभावी लिखाण केले आहे. शेक्सपिअरची भाषेवरील पकड, शब्दसाठा, स्वत: विकसीत केलेली विशिष्टपूर्ण लिखाणशैली त्याचबरोबर पारंपारिक साहित्य व सिद्धांत या पासूनची आवश्यक फारकत ह्या सर्व बाबी विशेषत्वाने अभ्यासण्याजोग्या व प्रेरणादायी आहेत.

अण्णा भाऊ साठे व विलियम शेक्सपिअर यांच्या साहित्याचा तौलनीक अभ्यास हा समकालीन साहित्याचा अत्यंत मोलाची भर घालणारा ठरू शकेल.

विलीयम शेक्सपिअर व अण्णा भाऊ साठे या दोघांचेही नायक नितीमूल्यांना जपणारे, शूरवीर,कलासक्त, स्त्रिदक्षीण्य व बेडर आहेत. शेक्सपिअरचा मकबेथ हा सर्वगुणसंपन्न आहे तरी अतिमहत्वकांक्षी आहे, हॅम्लेट हा विचारवंत व अभ्यासू असला तरीही योग्यवेळी निर्णय घेण्याची क्षमता नसलेला नायक आहे. तथापि ऑथेल्लो हा एक निपुण योद्धा असला तरी अतिशंकाखोर वृत्ती हि त्याच्या जीवनातील (ज्वहपब सिं) सर्वात मोठी कमजोरी बनते तर ज्युलिअस सिझर हा शेक्सपिअरचा अतिशय हुशार नायक असूनही त्याचा हेकेखोरपणा आणि अति आत्मविश्वास **(Tragic Hamertia)** हीच त्याची शोकांतिका बनते याच प्रमाणे किंग लिअर हा शेक्सपिअरचा नायकही सर्वश्रुत असूनही त्याच्या सदसदविवेक बुद्धीच्या अभावामुळे आपले सर्वस्व गमावून बसतो. अण्णाभाऊंच्या बाबतीत मात्र वेगळे चित्र पहावयास मिळते. त्यांच्यात शेक्सपिअरच्या नाय्कांमधील **(Tragic Hamertia)** कमतरता पहावयास मिळत नाही. अण्णाभाऊंचे पात्र 'फकीरातील' फकिरा, रानोजी, चित्रातील 'चित्रा' 'माकउचा

ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

माळ' मधील यंकू व दुर्गा, 'संघर्ष' मधील सुलभ व आनंद, 'वैजयंता' मधील वैजयंता व उमा, हि सर्व मुख्य पात्रे लढाऊ वृत्तीचे परिस्थितीशी दोन हात करण्यास सदैव तयार असणारी, शिल जपणारी, इतरांसाठी झगडणारी सामाजिक पत्र आहेत. शेक्सपिअरच्या पात्रांमध्ये असलेली कमतरता इथे आढळत नाही शेक्सपिअर हा भूतलावरील सर्व मानवांचा भाव विश्व, गुण दोष,प्रकृती, विविधता यांची उकल व मांडणी करण्याचा यशस्वी प्रयत्न करतो तर अण्णाभाऊंची पत्र ज्या हालाखीच्या परिस्थितीत आहे तिथे राहूनही प्रतिकुल परीस्थीतीला झुगारून मानवी मुल्यांची जोपासना करताना दिसतात. अण्णाभाऊ व शेक्सपिअर दोघांचीही पात्रे रेखाटणी, भाषा, अंतरीक तळमळ, त्यांची विनोदीबुद्धी व प्रामाणिकपणा यामध्ये भरपुर साम्य आहे. अण्णाभाऊ व शेक्सपिअर यांच्या नाटकातील स्त्री पात्रांचीही तुलना होऊ शकते. ज्युलियट, डेजडीमोना, रोजलींड, ओफिलिया हि शेक्सपिअरची स्त्री पात्रे अण्णाभाऊंच्या चित्रा, यंकु, दुर्गा, सुलभा, वैजयंता व उमा सारख्या बाण्याच्या व स्वभावाच्या आहे.

विलियम शेक्सपिअर हा इंग्रजी साहित्यातील अतिशय प्रभावी नाटककार होता. अण्णा भाऊ साठे व शेक्सपिअर यांच्यात अनेक बाबतीत साम्य आढळते. शेक्सपिअरने 34 नाटक लिहिलीत तर अण्णांच्या लेखणीतून 37 कादंबऱ्याचा आविष्कार झाला. शेक्सपिअर व अण्णा या दोघांचेही शिक्षण तसे जेमतेमच शेक्सपिअरच्या साहित्याचा जगातील बहुतांश देशात चवीने अभ्यास केला जातो. तर अण्णांच्या साहित्याचे आगोदरच रशियन, झेक, इंग्लीश, पोलिश, जर्मन इ. परदेशी व देशी भाषांत भाषांतर करण्यात आले आहेत. शेक्सपिअरच्या कित्येक नाटकांवर आधारित चित्रपट बनविण्यात आले आहे. तर अण्णांच्या कादंबरीवर आधारित डझनभर मराठी चित्रपट निघालेत व त्यापैकी तीन चित्रपटाना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळालेत. एकदंरीत अण्णा भाऊंना मराठी साहित्यातील शेक्सपिअर म्हटल्यास वावगे ठरू नये.

**संदर्भ: -**

1. कराडे स. दा. दलीत साहिलाची चिकित्सा. स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद २००१
2. मायकल एस.एम. दलीतस इन मॉडर्न इंडिया व्हिस्टा प्रकाशन 2006
3. निवडक वाड.मय लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, शासकीय प्रकाशन मुंबई
4. प्रसाद, अमरनाथ, दलीत साहित्य, स्वरूप प्रकाशन दिल्ली- 2007
5. रेगे, शर्मिला रायटीग कास्ट/ रायटीग जेंडर, जुबान प्रकाशन, 2006.